**नियमित दिवाणी दावा क्र. २६/२०२५ मधील नि.क्र.२७ वरील आदेश**

CNRNOMHSNo70002862025

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांचे विरुध्द विना लेखी कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ करुन तो आदेश रदद करुन त्यांची कैफियत व म्हणणे अभीलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. ५ यांनी असे नमुद केले आहे की, प्रस्तुतचा दावा जाहीर होवून मिळण्यसाठी व कायम ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतकामी कैफियत तयार करण्यास लागणरी जुनी महत्वाची कागदपत्रे त्यांना मिळाली नाहीत. त्यामुळे वादीच्या दाव्यास वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ यांच्याविरुध्द आपोआप विना कैफियत प्रकरण चालविण्याबाबत आदेश पारीत करण्यात आला आहे. तरी प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांचेविरुध्द विना लेखी जबाब व म्हणणे झालेला आदेश रदद करुन त्यांचे लेखी जबाब व म्हणणे अभीलेखावर घ्यावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. वादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र. २८ वर दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास वादीची काहीही हरकत नसल्याचे कथन केले आहे.

५. अर्ज व त्यावरील वादी यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यासाठी विलंबाचे कारण हे त्यांना वादमिळकतीबाबतची महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने कैफियत वेळेत दाखल करता आली नाही असे दिलेले आहे. असे असले तरी प्रस्तुत दावा हा जाहीर होवून मिळण्यसाठी व कायम ताकीदीसाठी दाखल केलेला असल्याने दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र. ५ यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची संधी देणे आवश्यक ठरते. वरील सर्व बाबी विचारात घेता प्रतिवादी क्र. ५ यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत व म्हणणे आदेश रदद करणे न्यायोचित ठरते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ५ यांनी वादी यांना रक्कम रुपये २००/– दिल्यानंतर त्यांची कैफियत व म्हणणे अभीलेखावर घेण्यात यावे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2025.10.09 11:50:29 +0530

स्थळ–कवठेमहांकाळ (श्रीमती एन.एस.कदम )

दिनांक ०८.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कवठेमहांकाळ